महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : १०९ वा दिनांक : २३/०१/२०२५ वार : गुरूवार

## लखनऊ-मुंबई पुष्पक एक्सप्रेसच्या प्रवाशांना दुसऱ्या ट्रेनने चिरडले




**जळगाव :** कर्नाटक एक्सप्रेसने पुष्पक एक्सप्रेसच्या अनेक प्रवाशांना उडवल्याची भयंकर घटना बुधवारी सायंकाळी ४ च्या सुमारास जळगाव जिल्ह्यातील परधाडे रेल्वे स्थानकालगत घडली आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, पुष्पक रेल्वेने अचानक ब्रेक लावल्यामुळे तिच्या चाकांमधून ठिणग्या उडल्या होत्या. त्यानंतर रेल्वेला आग लागल्याची अफवा पसरल्यामुळे प्रवाशांनी जिवाच्या आकांताने खाली उड्या मारल्या. पण त्याचवेळी दुसऱ्या ट्रॅकवरून येणाऱ्या कर्नाटक एक्सप्रेसने त्यांना उडवले. त्यात ११ जण ठार, तर ४० प्रवाशी जखमी झाल्याची माहिती आहे.

मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागाच्या अधिकृत सूत्रांनी सांगितले की, ज्या ठिकाणी ही घटना घडली त्या ठिकाणी तीव्र वळण होते. परिणामी, दुसऱ्या ट्रॅकवर बसलेल्या प्रवाशांना रेल्वे येत असल्याचे लक्षात आले नाही. त्यामुळेच वेगाने येणाऱ्या कर्नाटक संपर्क क्रांतीने इतक्या मोठ्या संख्येने लोक चिरडले गेले. घटनास्थळ मुंबईपासून ४०० किमी अंतरावर आहे.

मध्य रेल्वेचे सीपीआरओ स्वप्नील निला म्हणाले, मेडिकल रिलीफ ट्रेन भुसावळहून निघाली आहे. या अपघातात कोणत्याही प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, कर्नाटक संपर्क क्रांती एक्सप्रेस ही ट्रेन यशवंतपूरहून हजरत निजामुद्दीनला जात होती. तर पुष्पक एक्सप्रेस (१२५३३) लखनौहून मुंबईला जात होती. ब्रेक लावताना पुष्पक एक्सप्रेसच्या चाकांमधून धूर निघत होता. त्यामुळेच ट्रेनमध्ये आग लागल्याच्या अफवा पसरल्या आणि प्रवाशांनी घाबरून डब्यातून बाहेर उड्या मारल्या.

## पालकमंत्रिपदावरून होणारे आंदोलन योग्य नाही - चंद्रशेखर बावनकुळे



**मुंबई :** पालकमंत्रिपदाच्या मुद्यावरून रायगडमध्ये मंत्री भरत गोगावले यांच्या समर्थकांकडून होणारी निदर्शने योग्य नाहीत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्याची दखल घेतली पाहिजे, अशा स्पष्ट शब्दांत भाजप नेते तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शिवसेनेला खडेबोल सुनावले आहेत.

महायुती सरकारने शनिवारी सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची यादी जाहीर केली. त्यात नाशिकचे पालकमंत्रीपद भाजप नेते गिरीश महाजन यांच्याकडे सोपवण्यात आले, तर रायगडचे पालकत्व महिला व बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. पण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने या दोन्ही जिल्ह्यांवर दावा सांगितला. त्यांच्या पक्षाच्या दादा भुसे यांनी नाशिकवर, तर भरत गोगावले यांनी रायगडवर दावा सांगितला आहे.

विशेषतः भरत गोगावले यांच्या समर्थकांनी या प्रकरणी रायगड जिल्ह्यात रस्त्यावर उतरून निदर्शने सुरू केली आहेत. या पार्श्वभूमीवर चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी येथे आयोजित एका पत्रकार परिषदेत शिवसेनेच्या नेतृत्वाला त्याची योग्य ती दखल घेण्याचे आवाहन केले आहे. मंत्री भरत गोगावले यांच्या समर्थकांनी पालकमंत्रिपदाच्या मुद्यावरून रस्त्यावर उतरून निदर्शने केली. हे योग्य नाही. अशी निदर्शने त्या पक्षाच्या नेतृत्वाने थांबवली पाहिजेत. नाशिकमधील भाजपची निदर्शने आम्ही रोखली. एकनाथ शिंदे यांनी याची योग्य ती दखल घेतली पाहिजे, असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी लाडकी बहीण योजना ही माझी संकल्पना असल्याच्या एकनाथ शिंदे यांच्या दाव्यावरही आपले मत व्यक्त केले. महायुतीत लाडकी बहीण योजनेचे क्रेडिट घेण्याचा कोणताही वाद नाही. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महाराष्ट्रात राबवण्यात आली. ही योजना महायुती सरकारच्या काळात आली. तेव्हा एकनाथ शिंदे यांचे सरकार होते. मुख्यमंत्री हे सरकारचे प्रमुख असतात. त्यामुळे ते म्हणत असतील मी योजना आणली, तर त्यात काहीही गैर नाही, असे ते म्हणाले.

## फडणवीसांचा एकनाथ शिंदेंना झटका : एस.टी. महामंडळासाठी १३१० बस भाड्याने घेण्याची निविदा रद्द

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एसटी महामंडळासाठी १३१० गाड्या भाडेतत्त्वावर घेण्याची निविदा प्रक्रिया अखेर रद्द केली आहे. हा निर्णय तत्कालीन एकनाथ शिंदे सरकारने घेतला होता. त्यानंतर त्यावर अनेकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. आता फडणवीस यांनी हा आदेशच रद्द करून एकप्रकारे एकनाथ शिंदे यांनाच झटका दिला आहे.

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फेब्रुवारी २०२४ मध्ये एसटी महामंडळासाठी १३१० बसगाड्या भाडेतत्त्वावर घेण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली होती. या प्रकरणी महामंडळाच्या संचालक मंडळाच्या २१ विभागांसाठी विभागनिहाय निविदा प्रक्रिया राबवण्यात येणार होती. पण या प्रक्रियात मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा आरोप होता. या पार्श्वभूमीवर ही निविदा प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने नव्याने राबवण्याचे निर्देश देण्यात आलेत.

परिवहन विभागाने MSRTC च्या व्यवस्थापकीय संचालकांना दिलेल्या पत्रात, जुना करार रद्द करून नवीन निविदा मागवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नियुक्त केलेल्या अतिरिक्त मुख्य सचिव (वाहतूक) संजय सेठी यांच्या नेतृत्वाखालील समितीने हा करार रद्द करण्याची आणि नवीन निविदा मागवण्याची शिफारस केली असल्याची माहिती विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिली.

या समितीने एमएसआरटीसीच्या अधिकाऱ्यांची आणि सल्लागार संस्थांची चौकशी करण्याची शिफारस केली आहे. ही योजना २८०० कोटी रुपयांच्या घोटाळ्याची असल्याचा आरोप महाविकास आघाडीने केला होता. फडणवीस यांनी गत आठवड्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे परिवहन खाते असताना आणि शिवसेनेचे आमदार भरत गोगावले यांच्याकडे एमएसआरटीसीचे अध्यक्षपद असताना घेतलेल्या एमएसआरटीसीच्या निर्णयाला स्थगिती दिली. त्यानंतर परिवहन विभागातील डेस्क ऑफिसर सारिका मांडे यांनी हा निर्णय रद्दबातल झाल्याचा आदेश जारी केला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २३ जानेवारी २०२५


## माधवराव पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत बालविवाह प्रतिबंध जनजागृती रॅली व व्याख्यानाचे आयोजन




**नाईक नगर, ता. उमरगा येथील माधवराव पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या मार्फत शिबिराप्रसंगी बालविवाह प्रतिबंध जनजागृती रॅली काढताना प्रतापसिंग राजपूत अशोक बावगे, शिला स्वामी व स्वयंसेवक-स्वयंसेविका.**

**मुरुम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : नाईक नगर ता. उमरगा येथे श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत विशेष वार्षिक शिबिराप्रसंगी मंगळवारी (ता. २१) रोजी बालविवाह प्रतिबंध जनजागृती रॅली काढण्यात आली. दुपारच्या सत्रातील व्याख्यानाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंदी विभागाचे प्रा. डॉ. रमेश आडे होते.

याप्रसंगी मेरा युवा भारत या विषयावर हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. नागोराव बोईनवाड यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. राजू शेख, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. प्रतापसिंग राजपूत, प्रा. अशोक बावगे, डॉ. शिला स्वामी, डॉ. प्रकाश कुलकर्णी, प्रा. भूषण पाताळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. सायंकाळच्या सत्रात अध्यक्षस्थानी प्राणीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. किरणसिंग राजपूत होते. याप्रसंगी व्यसनमुक्ती : युवकांची भूमिका या विषयावर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. डॉ. रवींद्र गायकवाड, प्रा. दयानंद बिराजदार, प्रा. दिनकर बिराजदार, प्रा. दिलीप वाघमारे, प्रा. शिवकुमार मठपती, दिलीप घाटे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजनेच्या मार्फत बालविवाह प्रतिबंध जनजागृती रॅली घरोघर पोचविण्यात आली. प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रतापसिंग राजपूत यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. शिला स्वामी तर आभार प्रा. अशोक बावगे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, स्वयंसेवक-स्वयंसेविका यांनी पुढाकार घेतला.

## युपीएससी नागरी सेवा परीक्षेची अधिसूचना जारी:९७९ पदांची भरती होणार




केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) ने बुधवारी नागरी सेवा परीक्षा (CSE) २०२५ ची अधिसूचना जारी केली. यावर्षी ९७९ पदांवर भरती होणार आहे. याशिवाय, UPSC IFoS अर्थात भारतीय वन सेवा भरतीची अधिसूचना जारी करण्यात आली आहे. आयोगाने वन सेवेसाठी १५० पदांसाठी जाहिरात दिली आहे.

उमेदवार upsc.gov.in वर अधिसूचना, अभ्यासक्रम आणि परीक्षेचा नमुना तपासू शकतात.

**सूचना डाउनलोड करण्यासाठी येथे क्लिक करा**

**आता अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा**

**प्रिलिम्ससाठी एकदाच नोंदणी करावी लागेल**

UPSC CSE उमेदवार प्रिलिम्ससाठी प्रथम वन टाइम रजिस्ट्रेशन (ओटीआर) करावे लागेल. उमेदवार ७ दिवसांपर्यंत कोणताही डेटा पाहू शकतील. या प्रोफाइलमध्ये कोणताही बदल १८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत कोणत्याही शुल्काशिवाय करता येईल. UPSC CSE फॉर्ममध्ये कोणत्याही प्रकारच्या दुरुस्तीसाठी विंडो १२ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत खुली असेल. दुरुस्तीसाठी उमेदवारांना ७ दिवसांचा अवधी देण्यात येईल.

**आयोगाने हेल्पलाइन क्रमांकही जारी केला**

आयोगाने उमेदवारांसाठी हेल्पलाइन क्रमांकही जारी केला आहे. मार्गदर्शक तत्त्वांबाबत काही गोंधळ किंवा समस्या असल्यास, उमेदवार UPSC कॅम्पसच्या सुविधा काउंटर 'C' ला भेट देऊन मदत घेऊ शकतात. याशिवाय तुम्ही 011-23385271/011-23381125 या दूरध्वनी क्रमांकावरही कॉल करू शकता.

## लोकसभा विधानसभा निवडणूक २०२४ उत्कृष्ट कामगिरी; विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, उपविभागीय अधिकारी लतिफ पठाण यांना पुरस्कार जाहिर







**छत्रपती संभाजीनगर** : नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा व विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या अधिकाऱ्यांना मुख्य निवडणूक अधिकारी यांनी पुरस्कार जाहिर केले असून त्यात विभागीय आयुक्त दिलीप गावडे व जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना टपाली मतपत्रिकांचे देवाण घेवाण चे उत्कृष्ट नियोजनाचा पुरस्कार देण्यात आला असून सिल्लोडचे उपविभागीय अधिकारी लतिफ पठाण यांना उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी (१०४- सिल्लोड विधानसभा) म्हणून पुरस्कार जाहिर झाला आहे.

यासंदर्भात आज मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयाकडून पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. त्यात उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी लोकसभा, उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी विधानसभा, टपाली मतपत्रिका देवाण घेवाणचे उत्कृष्ट नियोजन, मतदान साहित्य प्राप्त करण्याचे नियोजन, उत्कृष्ट मतदार सुविधा, उत्कृष्ट वार्तांकन आणि उत्कृष्ट शासकीय भागीदारी अशा गटात पुरस्कार जाहिर झाले. त्यात लोकसभा निवडणुकीसाठी उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून छत्रपती संभाजीनगर विभागात लातूर जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर, विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी १०४ सिल्लोड लतिफ पठाण, तर टपाली मतपत्रिकांची देवाण घेवाण करण्याचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना पुरस्कार जाहिर झाला आहे. तर उत्कृष्ट वार्तांकनाचा पुरस्कार माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे तत्कालिन संचालक राहुल तिडके व दयानंद कांबळे यांना जाहिर झाला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २३ जानेवारी २०२५


## राष्ट्रीय सेवा योजनेचे मा.प्रदीप पाटील यांच्या हस्ते उद्घाटन




**उमरगा : (प्रा. नागसेन कांबळे)** तालुक्यातील बलसूर येथील भाऊसाहेब बिराजदार वरिष्ठ महाविद्यालय व श्री. छत्रपती शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बलसूर येथील मल्लिकार्जुन वस्ती येथे मंगळवारी (ता.२१ ) राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे नुकतेच उद्घाटन तंटामुक्ती अध्यक्ष मा.प्रदीप पाटील यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. स्वाती यादव या होत्या.

यावेळी शिबिरस्थळी प्रा .सतीश कांबळे, मा. बळीराम नांगरे, प्रा.पी.आर.कांबळे, प्रा.एन.टी.तेलंग, कार्यक्रम अधिकारी प्रा.के.डी.चौरे, प्रा. वामन भोरे, महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. मनिषा नागिले, प्रा.गणपत पाटील, प्रा.विजय घोडके, रघुनाथ पवार, राजेंद्र साखरे ,राजेंद्र भारती, दादा पाटील, विकास पाटील, सतीश कुंभार, राम दुधभाते, शंकर बिराजदार, अंजिक्य काळे, गणेश वाडीकर, आदींची उपस्थिती होती. यावेळी शिबिरातील विद्यार्थ्यांना संबोधित करताना प्रा. कांबळे म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेतून देशाच्या प्रश्नांपासून ते ग्रामीण भागातील मूलभूत समस्यां समजून येतात. त्या सोडवण्यासाठी युवकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. युवक हाच देशाचा मुख्य कणा असून युवकांनी देशप्रती आपली असलेली जबाबदारी घेऊनच ध्येय निश्चित करणे आवश्यक आहे. शिबिरातील विविध व्याख्यानाच्या माध्यमातून युवक सक्षम व सदृढ बनतो. युवकांनी समाजसुधारकांची आदर्श शिकवण आचरणात आणून जीवनमार्ग अवलंबिला तर निश्चित देशापुढील गंभीर समस्या सुटतील. हे सारे नितीमान, विवेकी, संवेदनशील नागरिक घडले तरच शक्य होणार असल्याचे प्रा.कांबळे यांनी सांगितले. याप्रसंगी प्रा.परमेश्वर सूर्यवंशी, प्रा.भोरे,शिक्षक बळीराम नांगरे यांचे समयोचित भाषणे झाली. प्रास्ताविक डॉ.मनीषा नागिले यांनी केले. तर सूत्रसंचालन प्रणिता बनसोडे व प्रणिता घोगे यांनी केले.तर साक्षी मातोळे यांनी आभार मानले.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे निवासी विशेष शिबिर १५ जानेवारी पासून मौजे जकेकुरवाडी येथे सुरू होते. "युथ फॉर माय भारत व युथ फॉर डिजिटल लिटरसी" ही थीम घेवून करण्यात आला होता. .याशिबिराचा समारोप दिनांक २१ जानेवारी रोजी जेकेकुरवाडी गावामध्ये करण्यात आला सात दिवसाच्या विशेष शिबिरामध्ये वृक्ष संवर्धन, शोष खड्डे, ग्राम स्वच्छता, अंतर्गत गटारीची कामे बालविवाह निर्मूलन जनजागृती, शेतकऱ्यास मार्गदर्शन, अॅनेमिया तपासणी, ग्रामीण युवकासाठी उद्योजकीय संधी,विविध पूर्ण सांस्कृतिक कार्यक्रम आदी उपक्रम या शिबिरादरम्यान घेण्यात आली होते. समारोप समारंभ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक , किरण बंडे, वैभव सूर्यवंशी, आपले मनोगत व्यक्त करून सात दिवसातील अनुभव त्यांनी सर्वांसमोर मांडला. उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून सिद्धू झंपले, रोहन कांबळे, पाचंगे अर्जुन प्रमाणपत्र देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

या शिबिराच्या निरोप समारंभाचे अध्यक्ष म्हणून डॉ वसंत गायकवाड सर यांनी विद्यार्थ्याने केलेल्या कामाचा कौतुक करून अशा राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरामुळे ग्राम विकासाला हातभार लागतो असे प्रतिपादन त्यांनी आपल्या अध्यक्षकीय भाषणात त्यांनी केले . प्रमुख उपस्थितीमध्ये जेकेकुरवाडीच्या शालेय समितीचे उपाध्यक्ष गणेश पाटील, प्रशालेचे मुख्याध्यापक दुधनाळे सर स्वयंसेवकांना मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले.तसेच महेश माने, सुनील औरादे आणि ग्रामपंचायत सदस्य या कार्यक्रमास उपस्थित होते डॉ. गिरीधर सोमवंशी(कार्यक्रमाधिरी) डॉ. भरत शेळके (कार्यक्रमाधिकरी) प्रा. सूर्यकांत राठोड, डॉ. वसंत गायकवाड, डॉ. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. मुरली जाधव, डॉ. अनिल देशमुख, प्रा. विजय पवार प्रा. मनोज गायकवाड, प्रा. डी.डी. पांढरे, प्रा.सचिन चव्हान, प्रा.सुजित शिंदेआदींनी शिबिराच्या यशस्वी करण्यामध्ये मोलाचे योगदान दिले

समारोप समारंभाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.भरत शेळके सरांनी केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सिद्धू झंपले यांनी केले तर आभार श्री प्रज्वल चव्हाण यांनी मांडले.

## प्रजासत्ताक दिन:मुख्य शासकीय सोहळा देवगिरी मैदानावर

**छत्रपती संभाजीनगर** (जिमाका) – देशाचा ७६ वा प्रजासत्ताक दिन समारंभाचा जिल्ह्याचा मुख्य शासकीय सोहळा पोलीस आयुक्तालयाच्या देवगिरी या मैदानावर रविवार दि.२६ रोजी सकाळी सव्वा नऊ वा. आयोजीत करण्यात आला आहे. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. या कार्यक्रमास सर्व स्वातंत्र्यसेनानी, लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी आदींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन विभागीय आयुक्त दिलीप गावडे व जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.मुख्य शासकीय समारंभात लोकांना सहभागी होता यावे यासाठी सकाळी साडेआठ ते दहा यावेळात ध्वजारोहणाचा इतर कोणताही शासकीय किंवा निमशासकीय समारंभ आयोजीत करण्यात येऊ नये. त्यांनी हे समारंभ सकाळी साडेआठ पूर्वी किंवा १० वाजेनंतर करावे,असे अपर आयुक्त सामान्य प्रशासन डॉ. अरविंद लोखंडे यांनी कळविले आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## ध्येयनिश्चिती, कठोर परिश्रमातून आयुष्य घडवण्यासाठी काम करा

**फैजपूर :** येणाऱ्या संकटांना धैर्याने सामोरे जावे, ध्येय निश्चिती करून कठोर परिश्रमाने व अचूक मार्गदर्शनाने कोणतेही यश साध्य होत असून, आयुष्याला अधिक सुंदर करण्यात विद्यार्थ्यांनी झोकून द्यावे असे प्रतिपादन प्रांताधिकारी बबन काकडे यांनी केले.

येथील धनाजी नाना महाविद्यालयात विद्यापीठ मानसशास्त्र विभाग व प्रधानमंत्री उच्चत्तर शिक्षा अभियान (पीएम उषा) सॉफ्ट कॉम्पोनंट अंतर्गत एकदिवसीय समुपदेशन कार्यशाळेत अध्यक्ष म्हणून बोलत होते. याप्रसंगी प्रा. मुरलीधर फिरके, व्यवस्थापन मंडळ सदस्य तथा माजी प्राचार्य डॉ.जी.पी. पाटील, संजय चौधरी यांसह कार्यशाळेचे उद्घाटक प्राचार्य डॉ. सी.पी. लभाने, शिक्षणशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता प्रा.डॉ. एस. टी. भुकन, प्रा. डॉ. जगदीश पाटील, प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघुळदे आदी उपस्थित होते. कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघुळदे यांनी केले. त्यात धनाजी नाना महाविद्यालयाचा ऐतिहासिक वारसा, परंपरा व विद्यापीठाने देऊ केलेल्या कोणत्याही विद्यार्थी हिताच्या कार्यक्रमाला झोकून देऊन यशस्वी करण्यात प्रयत्नरत असल्याचे मत मांडले. समुपदेशन कार्यशाळा आयोजित करण्याची संधी मिळाल्याबद्दल विद्यापीठाचे व संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाचे आभार व्यक्त केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २३ जानेवारी २०२५


## सुरेश धस वाल्मीक कराडचा पिच्छा सोडेनात

**बीड** : भाजपचे आष्टीचे आमदार सुरेश धस यांनी आता परळी येथील महादेव मुंडे यांच्या हत्येला वाचा फोडली आहे. त्यांनी या प्रकरणातील मारेकरी आका अर्थात वाल्मीक कराड याच्या मुलाभोवती फिरत असल्याचा दावा केला आहे. धस यांनी या प्रकरणाची चौकशी करून आरोपींना ताब्यात घेण्याची मागणी केली आहे. यामुळे आता वाल्मीक कराडसह त्याचा मुलगाही अडचणीत सापडण्याची शक्यता आहे.

महादेव दत्तात्रय मुंडे हे परळी तालुक्यातील भोपळा गावचे रहिवासी होते. पण २०२२ च्या आसपास ते अंबाजोगाईत राहण्यास आले. त्यांची २०२३ मध्ये परळी तहसीलच्या बाहेर हत्या झाली. त्यांच्या गळ्यावर व गालावर धारदार शस्त्राने वार करण्यात आले होते. आर्थिक व्यवहारातून ही घटना घडल्याचा दावा केला जातो. पण वस्तुस्थिति अद्याप बाहेर आली नाही किंवा या प्रकरणात एकाही आरोपीला अद्याप अटक झाली नाही.

सुरेश धस बुधवारी याविषयी पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, २२ ऑक्टोबर २०२३ रोजी महादेव दत्तात्रय मुंडे नामक एका तरुणाचा खून झाला होता. या खुनातील एकाही आरोपीला अद्याप अटक झाली नाही. या प्रकरणात आकाचा सुशील नामक मुलगा आरोपी आहे. त्याच्या अवतीभोवती या प्रकरणातील आरोपी फिरताना दिसतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या दावोस दौऱ्यावर गेलेत. ते तेथून परतल्यानंतर मी त्यांच्याकडे या प्रकरणाच्या चौकशीची मागणी करणार आहेत. यासंबंधीचे माझे पत्र तयार आहे. माझ्याकडे करुणा मुंडे व गणेश मुंडे यांच्यासंबंधीचेही पत्र तयार आहे.

ते पुढे म्हणाले, वाल्मीक कराड गँगने संतोष देशमुखांची हत्या केली. आता महादेव मुंडेंची हत्या डिटेक्ट झाली. पण महादेवच्या आरोपींना अजून अटक झाली आहे. विशेषतः या प्रकरणी ६ आरोपींची ओळख पटली होती. त्यानंतर तत्कालीन पोलिस निरीक्षक सानप हे त्यांना पकडण्यासाठी गेले होते. पण आकाने सांगितले की, पकडू नका. राजाभाऊ फड व आमच्या पक्षात नसलेल्या ५ जणांना आरोपी करा असे त्यांनी पोलिसांना सांगितले. पण सानप यांनी तसे करण्यास नकार दिला. त्यावर आकाने त्यांना परळीतून जाण्यास सांगितले. त्यानुसार सानप तेथून निघून गेले.

महादेव मुंडेंची हत्या परळीच्या तहसील कार्यालयाबाहेर झाली. या प्रकरणात एकूण ६ आरोपी होते. ते आताही आकाच्या मुलासोबत फिरतात. संतोष देशमुखांची हत्या सोडून सर्व हत्या परळीत झाल्या आहेत.

सुरेश धस यांनी यावेळी पीकविमा घोटाळा ५ हजार कोटीहून अधिकचा दावा असल्याचाही दावा केला. या प्रकरणी त्यांनी सरकारचा हा साडेतीनशे कोटींचा गैरव्यवहार असल्याचा दावा खोडून काढला. त्यांनी या प्रकरणी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना जाहीर चर्चा करण्याचेही आव्हान दिले आहे. पीकविमा घोटाळा ५ हजार कोटींहून मोठा आहे. माझी या प्रकरणी कुठेही चर्चा करण्याची तयारी आहे. मी हे प्रकरणही मुख्यमंत्र्यांपुढे मांडणार आहे. मुख्यमंत्र्यांनी यापूर्वीच या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची ग्वाही दिली आहे, असे ते कोकाटे यांना आव्हान देताना म्हणालेत.

## एकतर्फी प्रेम प्रकरणातून मुलीवर जीवघेणा हल्ला



**यवतमाळ** : एकतर्फी प्रेम प्रकरणातून एका १९ वर्षीय तरूणीवर चाकू हल्ला करीत मधात गेलेल्या आजीवर देखील हल्ला करण्यात आला. ही धक्कादायक घटना यवतमाळ तालुक्यातील एका गावात घडली असून गंभीर जखमी मुलीवर यवतमाळ शासकीय रूग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना सोमवारी दि. २० जानेवारीला वडगाव जंगल पोलिस ठाण्याच्या हद्दीत दुपारच्या सुमारास घडली. सुरज डोंगरे (वय २३) वर्ष रा. यवतमाळ असे गुन्हा नोंद करण्यात आलेल्या हल्लेखोर तरूणाचे नाव आहे.

या प्रकरणी पोलिस सुत्रांकडून मिळोलेल्या माहितीनूसार, यवतमाळ तालुक्यातील वडगाव जंगल पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या एका गावातील १९ वर्षीय विद्यार्थीनी यवतमाळ शहरातील एका कॉलेजमध्ये शिक्षण घेत होती. दरम्यान सुरज हा त्या मुलीला प्रेम करण्यासाठी जबरदस्ती करीत होता. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ती घरीच राहून अभ्यास करीत होती. काही दिवसापूर्वी सुरज याने त्या मुलीच्या घरी जावून तुझ्याशी लग्न करायचे आहे, असे म्हणाला. यावेळी त्याने कमरेला खोसून असलेला धारदार चाकू काढून त्या मुलीला माझ्या सोबत लग्न करीत नाही म्हणून तुझा मर्डर करतो असे म्हणाला. दरम्यान मुलीने त्या ठिकाणाहून पळ काढला असता, सुरज याने आजीच्या हाताला झटका मारून मुलीच्या मागे धावत तिच्या पोटात चाकू मारला. तसेच आजीला देखील चाकू लागल्याने ती देखील जखमी झाली. या प्रकरणी जखमी मुलीवर शासकीय रूग्णालयात उपचार सुरू असून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

हल्लेखोराला दिला चोप

मुलीसह आजीवर हल्ला करण्यात आल्यानंतर जखमी दोघींनीही आरडा ओरड केली. यावेळी गावकऱ्यांनी धाव घेत हल्लेखोर सुरज याला चाकुसह ताब्यात घेत चांगलाच चोप दिला. त्यानंतर वडगाव जंगल पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

## नाशिक जिल्ह्यात कृषी विभागाची मोठी कारवाई : ३ हजार ६०० हेक्टर क्षेत्राचा बोगस पिक विमा रद्द

**नाशिक** : नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा पिक विमा रद्द करण्याच्या सूचना कृषी विभागाने दिल्या आहेत. बोगस पिक विमा उतरवल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे. नाशिक जिल्ह्यात ५ हजार १७२ शेतकऱ्यांनी ३ हजार ६०० हेक्टर क्षेत्रावर बोगस पिक विमा उतरवल्याचे समोर आले आहे. यामध्ये कांदा उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. पिकाची लागवड केलेली नसतानाही त्या ठिकाणच्या क्षेत्रावर पिक विमा काढल्याचे समोर आले. अशा बोगस विमा उतरवणाऱ्या शेतकऱ्यांचा विमा रद्द करण्यात येणार आहे.

शेतातील पिकांचे नैसर्गिक संकटामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असते. या नुकसानीमुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट येऊ नये, यासाठी सरकारने एक रुपयात पीक विमा योजना सुरु करत शेतकऱ्यांच्या पिकांना एक प्रकारे सुरक्षा कवच दिले आहे. परंतु, यात काही शेतकऱ्यांकडून बनवाबनवी करत सरकारची फसवणूक केल्याचा प्रकार नाशिक जिल्ह्यातून समोर आला आहे.

कृषी विभागाने केलेल्या पडताळणीनंतर नाशिक जिल्ह्यात ५ हजार १७२ शेतकऱ्यांनी ३ हजार ६०० हेक्टर क्षेत्रावर बोगस पिक विमा उतरवल्याचे समोर आले. कमी क्षेत्रावर लागवड झालेली नसल्याचे शेतकऱ्यांनी न कळवल्याने ही बाब समोर आली. बोगस पिक विमा उतरवणाऱ्यांमध्ये कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा आकडा सर्वाधिक असल्याचे कृषी विभागाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे कृषी विभागाने विमा कंपन्यांना बोगस पिक विमा उतरवल्या शेतकऱ्यांचा विमा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे नाशिकचे उपसंचालक कृषी अधिकारी यांनी सांगितले आहे.

कृषी विभागाच्या पडताळणीनंतर सरकारच्या तिजोरीचा कोट्यवधी रुपयांचा भुर्दंड वाचला आहे. तर बोगस पिक विमाचा प्रकार उघडकीस आल्यानंतर येणाऱ्या काळात कृषी विभाग पिक विमा कंपन्यांच्या माध्यमातून सीएससी सेंटरला भेटी देऊन पिक विमा उतरवल्याची पडताळणी करणार आहेत.

## स्त्री-पुरुष सहजीवन आनंदासाठी स्त्री चळवळ

**मोहोळ** : मोहोळ चांगला माणूस होण्यासाठी व पुरुष सत्ताक व्यवस्थेतील चुकीच्या गोष्टी बदलण्यासाठी स्त्री-चळवळ महत्त्वाचे आहे. स्त्री-चळवळ,स्त्रीमु क्ती पुरुष विरोधी नसून स्त्री- पुरुष सहजीवन आनंदी होण्यासाठी स्त्री चळवळ महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे प्रतिपादन "मिळून साऱ्याजणी"या मासिकाच्या संपादिका डॉ.गीताली वि.मं.(पुणे) यांनी व्यक्त केले. सावित्रीबाई फुले महिला पतसंस्थेकडून व मकर संक्रांतीनिमित्त गुरुवारी दुपारी अडीच दरम्यान लोकसेवा कॉन्फरन्स येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते."स्त्री-स्व भान व नाती" या विषयांवर व्याख्याना याप्रसंगी त्या बोलत होत्या. प्रसंगी सावित्रीबाई फुले व संस्थेचे संस्थापक शाहीर कै. विश्वासराव फाटे यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. पतसंस्थेच्या चेअरमन संगीता फाटे यांनी प्रास्ताविक केले. तर महिला पतसंस्थेचे सल्लागार-मार्गदर्शक व मोहोळ अर्बन बँकेचे संस्थापक नंदकुमार फाटे, संचालिका अॅड. प्रांजली फाटे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी दामिनी पथक प्रमुख अंजना फाळके, रूपाली डोके, डॉ. स्मिता पाटील उपस्थित होत्या.
अध्यक्षपदावरून बोलताना डॉ. स्वाती गोळवलकर म्हणाल्या, स्त्रिया स्वतःच्या समस्याग्रस्त आयुष्याच्या अनुभवामुळे मुलींचा जन्म नाकारण्यात पुढे आहेत. त्यामुळे मुलगा-मुलगी समान मानायची मानसिकता करायला हवी. कुटुंबामध्ये उच्च शिक्षण घेऊन आलेल्या सुनेला, एवढी शिकलेली आहे. हिला आता घरातील आम्ही काय शिकवणार? असे टोमणे न देता सुनेच्या शिक्षणाचा कुटुंबाच्या प्रगतीसाठी उपयोग करावा. शालेय राज्यस्तरीय शूटिंग बॉल स्पर्धेत नागनाथ विद्यालयाच्या मोहोळमधील खेळाडू १७ व १९ वर्षे मुली गट यांचा अनुक्रमे महाराष्ट्रात तिसरा व दुसरा क्रमांक पटकावल्याबद्दल संस्थेच्या वतीने दोन्ही विजेत्या संघाला ट्रॉफी, गिफ्ट, सर्टिफिकेट देऊन सन्मानित केले.

राज्यस्तरीय स्पर्धेतील खेळाडूंचा सन्मान

भारतीय संस्कृती ही पुरुष प्राधान्य संस्कृती आहे. कायदे स्त्रियांच्या बाजूने आहेत. तरीही स्त्रियांना न्याय मिळत नाही. समाजात शांतता, पारदर्शीपणा हवा असेल तर स्वातंत्र्य, समता, मैत्रीपूर्ण वातावरण, सामाजिक न्यायासाठी समाज व्यवस्था बदलायला पाहिजे. मुले घरातील वातावरणात वावरताना आपल्यातूनच शिकत असतात. आपण म्हणतो की आई-वडिलांची सेवा फक्त मुलींनी नाही तर मुलांनीही केली पाहिजे, असे डॉ. गीताली म्हणाल्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २३ जानेवारी २०२५


## संविधान हेच महिला सबलीकरणाचे माध्यम - न्यायमूर्ती. व्ही. एन. काटकर



**कन्नड (अरुण थोरात):** राज्यघटना भारतीयांचा राष्ट्रीय ग्रंथ आहे हाच सर्वांच्या उत्कर्षाचा केंद्रबिंदू आहे विशेषतः जागतिक स्तरावर स्त्री- पुरुष यांच्यात अधिकाराच्या बाबतीत असमानता असताना भारतीय राज्यघटनेने समानतेच्या तत्त्वाचा स्वीकार करून विषमतेच्या तत्वाला छेद दिला त्यामुळे राज्यघटना ही महिलांच्या सबलीकरणाचे माध्यम आहे म्हणून तिची जोपासना करणे आपल्या सर्वांचे आद्य कर्तव्य आहे असे मत न्यायमूर्ती काटकर व्ही. एन. यांनी तालुका विधी सेवा समिती तथा दिवाणी न्यायालय कनिष्ठ कन्नड आणि शिवाजी महाविद्यालय कन्नड यांच्या वतीने विद्यार्थ्यांकरिता आयोजित केलेल्या कायदेविषयक जागृती शिबिरात बोलताना असे मत प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी आनंदी राहण्यासाठी संगीतातील सात सुरांचा आनंद घेतला पाहिजे तर अपघातापासून सुरक्षित राहण्यासाठी रस्ता सुरक्षितचे नऊ नियम काटेकोरपणे पालन केले पाहिजे तरच अपघातापासून आपला बचा होऊ शकतो अशी भूमिका यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक जारवाल केसरीया यांनी व्यक्त केली. लोकशाही आणि संविधान यांची कनिष्ठ नाते आहे संविधानिक मूल्यांच्या जोपासण्यातून भारतीय लोकशाही अधिक सक्षम केली पाहिजे. ही जबाबदारी युवकांची आहे त्यामुळे विद्यार्थी अवस्थेतूनच पासून संविधान योग्य रीतीने समजून घेतले पाहिजे व तिचा प्रचार आणि प्रसार केला पाहिजे असे आवाहन याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. व्ही. भोसले यांनी केले.या निमित्ताने लोकप्रशासन विभागाच्या वतीने भारतीय संविधानाचा अमृत महोत्सवाचे औचित्य साधून संविधानाचे अमृतमंथन या अनुषंगाने संविधान भान या लोकसत्ता वृत्तपत्रातील डॉ. श्रीरंजन आवटे यांच्या लेख सदराचे प्रदर्शन व लेख संकलनाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी डॉ. राहुल शिरसागर, डॉ. विजय मातकर, डॉ. बी.के.मगरे, डॉ.शिवाजी हुसे, मा.अरविंद कांबळे,डॉ. प्रकाश महाजन, ॲड. प्रदीप जाधव, डॉ.जगदीश बेलोंडे, डॉ. अतिश मेहत्रे , मा.संजय जाधव,मेहत्रे, तसेच पत्रकार मा. सहयोग जावळे, मा. विठ्ठल सिरसे व प्राध्यापक , प्राध्यापकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता पवन जाधव, ऋषी सूर्यवाड या विद्यार्थ्याने परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. वारे उमेश यांनी केले तर आभार प्रा डॉ. संजय भालेराव यांना मानले.

## मनपा प्राथमिक शाळेत पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन







**छत्रपती संभाजीनगर :** मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा सिमेंस प्रोजेक्ट जिग्यासा तसेच ISPF (Innovation of Science promotion foundation) यांचे संयुक्त विद्यमाने २२ जानेवारी रोजी पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.२४ विद्यार्थांनी हरित ऊर्जा ,पर्यावरण संवर्धन या विषयावर सादरीकरण केले. प्रथम क्रमांक -समरीन शेख, द्वितीय क्रमांक -आदित्य सोळुंके, तृतीय क्रमांक -गीता सोळुंके यांनी प्राप्त केले.तसेच मनपा चिकलठाणा शाळेला जर्मनीच्या टीमने भेट दिली. पोस्टर प्रदर्शनाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी सॉलिड एज चे सॉफ्टवेअर सादरीकरण केले. त्यातही विद्यार्थी अव्वल राहिले. जर्मनी टीमचे स्वागत लेझीम पथकाने पारंपारिक पद्धतीने स्वागत केले. जर्मनी टीमने वर्गात भेट देऊन विविध खेळ घेतले. त्यात विद्यार्थ्यांना प्रोत्साहन पर बक्षीसही दिले.या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी केदारी नरेश कुमार, रावत सपना,रुमनिंग वाल्फगांग , मोहंमद अनीस, शिवाकुमार सेठीकुमार, उपस्थित होते.पोस्टर चे परीक्षण श्री.प्रसाद बावचे यांनी केले.कार्यक्रमाचे संयोजन सीमा डोंगरे, प्रिया ठाकूर यांनी केले.या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री.प्रभाकर शिंदे,मनिषा शिंदे यांनी विषेश प्रयत्न केले तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## विद्यापीठाचे मागील गेट उघडा



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वाणिज्य विभागाकडील म्हणजेच बीबी का मकबऱ्याच्या मागील बाजूने असलेले गेट विद्यार्थी व कर्मचारी यांच्या सोयीचा असून विद्यापीठाने या गेटला कुलूप बंद केले आहे. हा गेट रहदारीसाठी लवकरात लवकर सुरू करावा यासाठी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे माजी सदस्य प्रा. फुलचंद सलामपुरे, आधी सभा सदस्य प्रा. डॉ. उमाकांत राठोड, प्रा. हरिदास सोमवंशी, यांच्यासह शिष्ट मंडळाने प्र कुलगुरु डॉ. वाल्मीक सरवदे यांची भेट घेऊन चर्चा केली आणि निवेदनही दिले. या निवेदनावर प्रा. लोकेश कांबळे भारतीय विद्यार्थी सेनेचे विद्यापीठ प्रमुख डॉ.तुकाराम सराफ, डॉ. नामदेव कचरे ,दिग्विजय शिंदे, ऋतुराज गायकवाड, सादिक शेख, डॉ. एम.जी. शिंदे , प्रा. डॉ. बिरांगणे यांच्या सह्या आहेत


